सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (खुद्द) मधील निर्लेखित शासकीय वाहन क्र. MH 01 AN 3999 ची विक्री करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**मंत्रालय, मुंबई ४०००३२**
**शासन निर्णय क्र. वाहन २०२५/प्र.क्र.४१/आस्था २**
**दिनांक :- २५ मे, २०२६**

**संदर्भ** :- १) वित्त विभाग, शासन परि. क्र. डीएफपी १०९१/प्र.क्र.४/विनियम, दि.१८.०६.१९९१
२) वित्त विभाग, शासन परि. क्र. वाहन २०१३/प्र.क्र.३१/१३/विनियम, दि.२०.०९.२०१३
३) वित्त विभाग, शासन परि. क्र.डीएफपी १०१६/प्र.क्र.०७/१६/विनियम,दि.२२.०६.२०१६
४) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वाहन २०२५/प्र.क्र.१९/विनियम, दि.१७.०९.२०२५
५) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (खुद्द), शासन निर्णय क्र. वाहन २०२५/प्र.क्र.४१/ आस्था २, दि.०७.०१.२०२६

**प्रस्तावना :**

सहकार, पणन व वस्त्राद्योग विभाग (खुद्द) मार्फत माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये खरेदी केलेले व मा. मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे वापरात असणारे वाहन क्र. MH 01 AN 3999 (टोयोटा इनोव्हा) हे संदर्भ क्र. ५ येथील शासन निर्णयान्वये, वापरास निरूपयोगी ठरवून निर्लेखित करण्यात आले होते.

२. तद्नंतर, संदर्भ क्र. ४ येथील शासन निर्णयान्वये, मा. मंत्री (वस्त्रोद्योग) यांचेकरिता, विभागामार्फत माहे एप्रिल, २०२६ मध्ये नवीन वाहन खरेदी करण्यात आले.

३. संदर्भ क्र. २ मधील परिपत्रकानुसार, निर्लेखित/भंगार वाहनांची विल्हेवाट लावणे/विक्री करणे याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची आहे (या प्रकरणी संबंधित विभाग सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय हा आहे). त्याचप्रमाणे, निर्लेखित वाहनांच्या बदली नवीन वाहने खरेदी केल्यानंतर, दोन महिन्यांच्या आत निर्लेखित वाहनांची विक्री करणे बंधनकारक आहे.

४. संदर्भ क्र. १ व ३ मधील वित्त विभागाच्या मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करून, वाहन विक्रीची निविदा, महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर दि. १२ मे, २०२६ ते २० मे, २०२६ या कालावधीत तसेच राज्य पातळीवर चांगला खप असणाऱ्या मराठी व इंग्रजी वृत्तपत्रात (अनुक्रमे पुढारी व इंडियन एक्सप्रेस) दि. १२ मे, २०२६ रोजी प्रकाशित करण्यात आली.

५. यानुषंगाने, विहित मुदतीत म्हणजेच, दि. २० मे, २०२६ रोजीपर्यंत या विभागाकडे एकूण १९ (एकोणीस) निविदा बंद लिफाफ्यात प्राप्त झाल्या.

६. महत्तम निविदाधारकास उपरोक्त वाहनाची विक्री या विभागामार्फत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाकडून आता खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :**

विभागाकडे प्राप्त १९ निविदांपैकी, महत्तम निविदा ही श्री. विशाल डोडिया यांची असून, निविदेची रक्कम रु. ४,६०,००० (अक्षरी रक्कम रुपये चार लक्ष साठ हजार) इतकी असून ही किंमत लिलावाच्या किंमतीहून अधिक आहे.

२. सबब, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (खुद्द) मार्फत, सन २०१५ मध्ये खरेदी करण्यात आलेल्या व वापरण्यास निरूपयोगी ठरविलेल्या वाहन क्र. MH 01 AN 3999 (Toyota Innova, 2.5 Z, E4, S White) ची विक्री शासनामार्फत, श्री. विशाल डोडिया यांना पुढील अटी व शर्तींच्या अधीन राहून करण्यात येत आहे:

अ) सादर केलेल्या निविदा रकमेचा म्हणजेच, रु. ४,६०,००० इतक्या रकमेचा भरणा विभागाच्या रोख शाखेमध्ये तात्काळ करावा.

ब) रोख शाखेमध्ये जमा केलेली रक्कम कुठल्याही परिस्थितीत पुन्हा मिळणार नाही.

क) वाहनावर सद्य:स्थितीत असणारी आर्थिक जबाबदारी (उदा. चलन/दंड) निविदाधारकाची असेल. यासाठी शासन कुठल्याही प्रकारे जबाबदार असणार नाही.

ड) वाहनावर आकारण्यात येणारा कर, वाहन हस्तांतरण प्रक्रियेचा सर्व खर्च इ. शुल्क अदा करण्याची जबाबदारी देखील निविदाधारकाची असेल.

इ) वाहन हस्तांतरणाची प्रक्रिया पार पडल्यानंतर आणि त्याचा लेखी पुरावा या विभागाकडे सादर केल्यानंतर, मंत्रालय पार्किंगमध्ये ठेवलेले वाहन, जसे आहे तसे, स्वखर्चाने नेण्याची जबाबदारी निविदाधारकाची असेल.

ई) मंत्रालयातून वाहन बाहेर नेल्यानंतर, त्या वाहनाबाबत शासनाची कुठलीही जबाबदारी राहणार नाही.

३. परि. २ मध्ये नमूद अटी व शर्तींच्या अधिन राहून, या विभागातील शासकीय वाहन क्र. MH 01 AN 3999 ची विक्री, श्री. विशाल डोडिया यांना रु. ४,६०,००० इतक्या रकमेस करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभाग, शासन परि. क्र. वाहन २०१३/प्र.क्र.३१/१३/विनियम, दि. २० सप्टेंबर, २०१३ मधील परिच्छेद २ नुसार, प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०५२५१७३२५३३८०२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NITIN VASANTRAO GAIKWAD

Digitally signed by NITIN VASANTRAO GAIKWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD,
2.5.4.20=5892C3FD8686C1921E784A3FAA9888D155B03F5591CE11B21A1B5006247F6972, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2276AC762AF372D872C2F01D5BB5086166F4A6E20A1BDF9762D556A93F5D118E, cn=NITIN VASANTRAO GAIKWAD
Date: 2026.05.25 17:35:11 +05'30'

**( नितीन गायकवाड )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) खाजगी सचिव, मा. मंत्री (वस्त्रोद्योग), मंत्रालय, मुंबई

२) प्रधान सचिव (सहकार व पणन), मंत्रालय, मुंबई

३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
४) नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई
५) क.अ.(विनियम), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
६) क.अ.(रोख शाखा), सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
७) श्री. विशाल डोडिया
८) निवड नस्ती (आस्था २)